# पंडित जवाहरलाल नेहरूंचे लोकशाही समाजवादी विचार

डॉ. संतोष बाबुराव कुऱ्हे, सहयोगी प्राध्यापक तथा लोकप्रशासन विभागप्रमुख
स्वा सै. सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा. जि. परभणी.

..........................................................................................

**प्रस्तावना :**

स्वतंत्र भारताचे पंडित जवाहरलाल नेहरू हे शिल्पकार होते. त्यांनी भारताचा गौरवशाली इतिहास, मानवतावादी सत्य, अहिंसा, संहिष्णूता या शाश्वत मूल्यांची जगाला नव्याने ओळख करून दिली. गौतम बुद्ध, वर्धमान महावीर महात्मा गांधी यांच्या विचारांचे महत्व आपल्या आचरणात आणून जगाला महायुद्धापेक्षा जगातिक शांतता व सामंजस्य किती महत्वाचे आहे हे संपूर्ण जगाला महायुद्धापेक्षा पटवून दिले म्हणुन जगाला शांतीचा संदेश देणारे शांतिदूत म्हणून ते ओळखले जातात. भारताची स्वतंत्र देश म्हणून जडणघडण होत असताना देशात समता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, राष्ट्रवाद, सत्य, आहिंसा, विश्वशांती, निर्भयता, मानवता, संवदेनशीलता, वैज्ञानिक दृष्टी समतोल विकस, पंचायतराज, लोकशाहीखे विकेद्रीकरण अशी मुल्याधिष्ठित लोकशाही समाजवाद स्वतंत्र भारताता रूजविण्याचे कार्य पंडित जवाहरालाल नेहरू यांनी केले. म्हणूनच अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. जॉनसन असे प्रतिपादन करतात की, ‘जग युद्धापासुन पूर्णपणे मुक्त व्हावे यासाठी नेहरूंनी निर्भयपणे प्रयत्न केले. याद्वारे नेहरूंनी संपूर्ण मानवजातीची सेवा केली.

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व अन्वेषणात्मक आराखडयाचा उपयोग केला आहे.

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ , पुस्तके, मासिके, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश :—**

१. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे विचार अभ्यासणे
२. पंडित नेहरू यांच्या विचारांची गरज जाणून घेणे.
३. नेहरूंचे लोकशाही समाजवादी विचार अभ्यासणे.

**गृहीतकृत्ये :—**

१. पंडित जवाहरलाल नेहरूयांच्या लोकशाहीच्या विचारांची जगाला गरज आहे.
२. पंडित नेहरू यांनी समाजवादी लोकशाही सांगीतली

**स्वातंत्र्यचळवळीत सक्रिय सहभाग :—**

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे वडील मोतीलाल नेहरू हे स्वातंत्र्यलढयातील एक प्रभावी नेते होते. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, ॲनी बेझंट या नेत्यांसोबत स्वतंत्र्यलढयात सक्रिस सहभाग नोंदविला.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या व्यक्तिमत्वावर अनेक पाश्चात्य व भारतीय विचारवंतांचा प्रभाव पडला होता, त्यात रसेल, कार्ल मार्क्स, हर्बर्ट स्पेन्सर, जॉर्ज बनॉर्ड शॉ, आईनस्टाईन इ. पाश्चात्य तर विवेकानंद, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, अरविंद घोष इत्यादी विचारवंतांच्या प्रभावामुळे त्यांचे विचार सत्य, अहिंसा, सत्याग्रह, मानवतावाद, लोकशाही समानवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय आदीं मूल्ये त्यांच्या व्यक्मितत्वांत रूजली आहेत.

## नेहरूंचे लोकशाही समाजवादी विचार :—

म. गांधीजीच्या प्रेरणेने राष्ट्रीय चळवळीत उतरलेल्या नेहरूंनी मध्यमवर्ग, कामगार, शेतकरी अशा वर्गाच्या आंदोलनामध्ये भाग घेतला होता. देशातील दारिद्र्याची तीव्रता त्यांनी समजली होती. श्रीमंत घरात जन्माला आलेले असताना गरीब आणि सामान्य माणसांच्या सुख—दु:खात ते सहजच एकरूप होत.

नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रात नमुद केले आहे की, कारखान्यामधून अतिशय हलाखीच्या परिस्थितीत कामगारांकडून काम करून घेतले जाते. मजूरी वाढवा अगर कामाचे तास कमी करा. आशी मागणी करताच भांडवलदार दातओठ खाऊ लागलात. मात्र संधी सापडताच हे मालक गडगंज नफे उठवतात. छोटयात छोटया कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांची स्थिती तर अतिशय निकृष्ट दर्जाची आणि केविलकाणी असते. ज्यूट व कापड गिरण्यांच्या लक्षाधीश मालकांचे भव्य प्रासाद आणि सुखविलास एकीकडे तर दुसरीकडे अर्धनग्न, अर्धपोटी कामगारांचे तबेले शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचे चित्रही त्यांनी रेखाटले आहे. तो हा शेतकरी दारिद्र्यात इतका अडकला आहे. की कसा जिवंत राहतो याचे मला आश्चर्य वाटते. दृष्काळ हा त्याच्या पाचवीला पुजला आहे. त्याला कोठेही आधर नाही, गती नाही, चोहोंकडून गांजलेल अव्याहत खडतर श्रम करणारा हा शेतकरी करणार तरी काय ? महाभयंकर परिस्थितीत भूतदयेच्या अथवा ग्रामसुधारणेच्या स्थानिक प्रयत्नांनी त्यांचे जीवन सुखकारक होऊ शकते, असे म्हणणे शेतकऱ्यांची व त्यांच्या दारिद्र्याची टवाळी करण्यासारखे आहे मग करावयाचे काय ? दारिद्र्याच्या चिखलातून देशाला कसे बाहेर काढायचे ? निर्जीव करणाऱ्या पराभूत वृत्तीपासुन राष्ट्राचा बचाव कसा करायाचा ?

असे अनेक प्रश्न मनात घेवून द१९२७ साली युरोपमध्ये गेले होते. युरोपमध्येही दारिद्र्य होते, अन्याय होता, पण त्याचबरोबर मेद आलेली सुबकता होती. परंतू जनतेचे प्रश्न सोडविण्याचे कार्यक्रम होती घेण्याऐवजी युद्धाची तयारी तेथे चालू असलेली नेहरूंना दिसली. भारतात परतण्यापूर्वी नेहरू राशियात गेले. तेथील राष्ट्र उभारणीच्या समाजवादी प्रयोगाचा त्याच्यावर फार मोठा प्रभाव पडला.

जगात घडणाऱ्या आर्थिक आणि राजकीय घडामोडी फार महत्वाच्या आहेत. एकोणिसव्या शतकातील पद्धतीची केव्हाच इतिश्री झाली आहे. सध्याच्या जगाला कालबाहय सिद्धांत लावून प्रश्नांची उकल होणार नाही. बैलगाडी रूळावर पिटाळली म्हणून काही तिला आगगाडी म्हणता येणार नाही. जर सध्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत सुधारणा शक्य नसेल तर ती पद्धती तरी कशाला जिवंत ठेवावयाची ? मार्क्सवादी पद्धतीने इतिहासाचे व चालू घडामोडीचे जसे आकलन होते तसे अन्य कोणत्याही पद्धतीने होत नाही. प्रश्न केवळ आकलनासाठी नाहीत तर ते परिस्थिती बादलण्याचा मार्ग आहे. समाजवाद हे एकच उत्तर मला दिसते ?

देशातील तरूणांवर नेहरूंच्या विचारांचा. नेतृत्वाचा विलक्षण परिणाम झाला. गांधीजीच्या नेतृत्वाखाली असलेल्या कॉग्रेस चळवळीतही नेहरूंना स्वतंत्र स्थान प्राप्त होऊ लागले.

स्वतंत्र्य मिळाल्यानंतर देशाची कशा पद्धतीने रचना करावयाची याचा विचार तेव्हाच केला होता. समाजवादाकडे जाताना देशात सुरू झालेली औद्योगिक क्रांतीची प्रक्रिया पूर्ण करावयाची, योजनाबद्ध रितीने अर्थिक विकास करावयाचा सरंमजामशाही गाडून टाकावयाची, विज्ञानयुग आणि तंत्रयुग देशात आणून भारतवर्ष राष्ट्र करावयाचे असे नेहरूंचे स्वप्न होते.

नेहरूंना खुद्द कॉग्रेस संघटनेत मोठया प्रमाणत पाठिंबा मिळू लागला होता सन १९२७ मध्ये मद्रासला भरलेल्या कॉग्रेस अधिवेशनात भारताचे ध्येय संपूर्ण स्वतंत्र्य हे आहे, अशा आशयचा ठराव जवाहरलालजींनी मांडला.

२५ डिसेंबर १९२९ रोजी अखिल भारतीय कॉग्रेस अधिवेशनात म.गांधीप्रमाणे नेहरूंचे नेतृत्वही फुलून आल्यामुळे ५० हजार लोक उपस्थित होतील. अशी व्यवस्था होती.

मुंबई महाराष्ट्रात तर नेहरूंच्या विचाराला उचलून धरणारा मोठा वर्ग होता. आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, काकासाहेब गाडगीळ, शेकरराव देव यांच्यासारख्यांनी नेहरूवाद आणि गांधीवादाची उत्कृष्ट गुंफण केली होती. त्याचप्रमाणे नेहरू आता सुरू झालेल्या स्वतंत्र्ययुगाचे उद्गाते होते. स्वराज्य या शब्दाचा अर्थ संपूर्ण स्वातंत्र्य असे या अधिवेशनात धोषित केले गेले.

नेहरू आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, स्वातंत्र्याचे ध्येय केव्हा व कसे गाठता येईल, हे आज सांगता येत नाही. यश हे हुकमी नाही, परंतु जे धैर्याने पाऊल टाकतात त्यांनाच यश माळ घालते. भित्र्यांकडे व परिणामाचा आगाऊ हिशेब करणाऱ्यांकडे ते ढुंकूनही पाहत नाही. आपण सर्वस्व पणाला लावून या लढयात आहोत आणि उदत्त ध्येये आपणाला गाठावयाची इच्छा असेल तर ते घनघोर संकटांना तोड दिल्याशिवाय शक्य नाही.

लोकांच्या मागण्या सरकारने मान्य कराव्या म्हणुन कॉंग्रेसने कलकत्ता अधिवेशनात साकारला दिलेला एक वर्षाचा अवधी ३१ डिसेंबर रोजी रात्री १२ वा. संपला व राष्ट्रीय सभेने त्याक्षणी संपूर्ण स्वतंत्र्याची घोषणा करून म. गांधीजीच्या सानिध्यात जवाहरलालजींनी राष्ट्रध्वज फडकविला आणि लाहोरला जमलेल्या हजारो कार्यकर्त्यांनी त्याला मानवंदना दिली.

२७ डिसेंबर १९३६ रोजी कॉंग्रेसच्या फैजपूर येथील अधिवेशनात जगात दुसरे महायुद्ध जवळ येत आहे. या संघर्षात भारताने एकमुखे फळी उभारून ब्रिटिश साम्राज्यला हाकलून देण्याची तयारी करण्याचे आवाहन नेहरूंनी केले.

आम्ही राज्य चालविण्यासाठी मंत्रिमंडळे बनवीत नसुन इंग्रजांचे येथील राज्य खिळखिळे करण्यासाठी बनवीत आहोत, असे नेहरू सांगत.

७ ऑगस्ट १९४२ रोजी दुपारी २.३० वा. सुरू झालेल्या अधिवेशनात आठ ते दहा हजार लोकांसमोर गांधीजीच्या भाषणानंतर जवाहरलाल नेहरूंनी भारत छोडोछ चा मुख्य ठराव मांडला. सरदार पटेलांनी त्यास अनुमती दिली.

रशिया व चीन आघाडीवर असुन जी परिस्थिती आहे, तिच्याबद्दल भारताला चिंता वाटते. स्वतंत्र्याशी निगडीत आहेत. हिंदुस्थानला स्वतंत्र्य देणे वा न देणे यावरच संयुक्त राष्ट्रे आणि ब्रिटन यांची कसोटी लागणार आहे. हिंदुस्थान स्वतंत्र होण्यावर युद्धाचे आणि जागतिक लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे.

१५ ऑगष्ट हा मंगल दिन उजाडला, अतिशस दाटलेल्या अंत:करणाने जवाहरलाल नेहरूंनी उच्चारलेल्या भावनांना व्यक्त करायला सुरवात केली.

'अनेक वर्षापूर्वी आपण नियतीशी एक करार केला होता. आज त्याची पूर्ती सर्वार्थाने का नसेना पण पुष्कळशा अर्थाने आपण करीत आहोत. मध्यरात्रीच्या प्रशांत समयी सारे जग झोपलेले असताने भारत स्वतंत्र्याच्या युगात नवा जन्म घेत आहे. पुन्हा एकदा नव्या भारताचा शोध हा देश घेत आहे. ही वेळ क्षुद्रपणा गाडून टाकण्याची आहे विघातक टीकेला मूठमाती देण्याची आहे. आपल्याला स्वतंत्र भारताचा एक उत्तुंग प्रासाद उभारावयाचा आहे. दारिद्रय अन्याय, विषमता याचा शेवट करावयाचा आहे. देशाची सेवा म्हणजे येथील गरीब जनतेची सेवा या युगातील सर्वश्रेष्ठ माणसाचे म. गांधीचे स्वप्न आपल्याला भूतलावर आणवयाचे आहे. हरएक नेत्रातला अश्रू आपल्याला पुसून टाकायचा आहे. ही गोष्ट आपल्या शक्तीबाहेरची आहे. असे आपल्याला वाटेल, पण जोवर जगात यातना आणि अश्रू आहेत तोवर आपले सेवेचे काम चालू असलेच पाहिजे.

पंतप्रधान पं. नेहरूनी पोर्तुगीजाच्या दादागिरीला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसविले आणि १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा मुक्त झाला. अशा रीतीने भारतातील साम्राज्यशाहीच्या खुणा पूर्णपणे पुसल्या गेल्या.

**सारांश :—**

पं. नेहरू आधुनिक विचारांचे, वैज्ञानिक दृष्टिकोन असणारे राजकीय सामाजिक, आर्थिक विचारवंताबरोबर ते उच्च प्रतीचे लेखकही होते. स्वतंत्र भारतास एक मजबूत राष्ट्र म्हणून उभारणीत पं. नेहरूंचे योगदान अतुलनीय आहे. देशात व देशाबाहेरील अलिप्ततेच्या व पंचशीलाच्या तत्वाचा पुरस्कार शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहिले देशाचा अर्थिक विकास, स्ववलंबना— शिवाय देशाची प्रगती होऊन देश मजबूत होईल, याची त्यांना जाणीव होती. देशातील समाजिक व आर्थिक विकास संपुष्टात आणण्यासाठी देशाला नियोजनाबद्ध विकासाची त्यांनी देणगी दिली. तसेच लोकशाही विकेंदिकरण व संसदीय शासन प्रणालीचे मूल्ये आपल्या आचार—विचारातुन जनमानसात त्यांनी रूजविले. स्वातंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी त्यांनी महत्वापूर्णा भूमिका बजावली संविधान समितीच्या पहिल्याच बैठकीत ठरावात त्यांनी प्रतिपादन केले होते की, संविधान समिती ठामपणे व गंभीरपणे भारताचे स्वतंत्र सर्वभौम गणराज्य घोषित करीत आहे. हेच संविधान स्वतंत्र भारताचे संविधान म्हणून लागू करण्यात आले.

भारतीय इतिहासातील नेहरूंचे स्थान ध्रुव ताऱ्यासारखे आहे. त्यांनी समाजिक सुधारणा क्षेत्रातही वर्ग, जात लिंग याचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार याबाबतीत नेहरू दीपस्तंभ होते. सुखी व भरभराटीला आलेल्या भारताच्या विकासाचा पाया त्यांनी घेतला. जॉफ्रेटायसन यांनी नेहरूच्या एका चरित्रात जर नेहरू वेगळया व्यक्ती असली तर भारतही तसाच वेगळया प्रकारचा देश राहिला असता.

**संदर्भसुची :—**

१. प्रशासकीय विचारवंत — प्र. जी.एच.बिराजदार, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष २०००
२. कथा स्वातंत्र्याची — कुमार केतकर, महराष्ट्र पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम व संशोधन मंडळ पुणे.
३. प्रा. पाटील बी. बी.: (१९९७), भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर